MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-31, Vol-07 July to Sept. 2019

Editor

Dr.Bapu G.Gholap

14) अन्न विषबाधा आणि भूकबळी एक समस्या
प्रा. डॉ. प्रदिप एच. गजभिये, नागपूर ||71

15) ग्रामरक्षण व ग्रामशुध्दी विषयक राष्ट्रसंतांचे विचार
डॉ. सोपानदेव वि. पिसे, नागपूर ||74

16) संशोधन क्षेत्रात जागतिक साहित्याचे योगदान
डॉ. संध्या उध्दव सामुद्रे, अकोला ||79

17) जीवनकौशल्यांचा शैक्षणिक संपादनावर व व्यक्तिमत्त्वातील घटकांवर होणारा ...
विलास सिताराम वेखंडे, डॉ. नागराज राव, ठाणे ||82

18) मराठवाडयाच्या ऐतिहासिक विकासात कै. गोपीनाथराव मुंडे यांचे योगदान
डॉ. रामकिशन गुंडीबा चाटे, नांदेड ||85

19) जीवनात सर्वोदय विचारांची उपयुक्तता
पुनस्कर संजय शेषराव, नागपूर ||88

20) महाराष्ट्रातील पर्यटन : संधी आणि समस्या
प्रा. पवार शरद सूर्यकांत, बीड ||91

21) उच्च व शारीरिक शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि उपयुक्तता -एक अभ्यास
डॉ दिलीप बी कोहळे, नागपूर ||93

22) वाचनाचे बदलते स्वरुप
मस्के सुर्यकांत बाबुराव, लातूर ||96

23) प्रश्नावली - प्राथमिक तथ्य संकलनाचा एक स्त्रोत
प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव, बीड ||100

24) किशोरावस्थेतील विद्यार्थिनीच्या आहार विषयक सवयींचा अभ्यास करणे व त्याच्या शारीरिक सुदृढता ...
श्रीमती शामल राजपुत, नाशिक ||102

25) साहित्य और हिन्दी सिनेमा — कथाकार प्रेमचंद के संदर्भ में
डॉ. उषा बनसोडे, औरंगाबाद ||106

26) भारत—पाक सम्बन्धों के मध्य कश्मीर
डॉ. राकेश इस्टवाल, पौड़ी गढ़वाल ||110

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

22

# वाचनाचे बदलते स्वरुप

**मस्के सुर्यकांत बाबुराव**
ग्रंथपाल,
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.

**********

जिथे ग्रंथ नाही तिथे ज्ञान नाही ।
जिथे ज्ञान नाही तिथे सौख्य नाही ।
ग्रंथालयावीणा जो गाव राही ।
तिथे जीवना काहीच अर्थ नाही ।।

ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. ग्रंथ माणसाला विविध विषयाचे ज्ञान देतात. ग्रंथाजवळ गरीब, श्रीमंत, उच्च, नीच असा भेदभाव नसतो. जगातील प्रत्येक महान नेत्याने सुरूवातीच्या काळात ज्ञानार्जन करुनच आपण मार्ग निश्चित केल्याचे उदाहरणे आहेत. आज कॉम्प्युटर, नेट, वेब, फेसबूक, युट्युब, व्हॉट्सॲप अशा विविध अत्याधुनिक माध्यमानी आजच्या युवकांना वाचनापासून परावृत केले आहे. थोडासा फावला वेळ मिळाला की फेसबुक, व्हॉट्सॲप व युट्युब, टीव्ही सुरु करुन आपल्या पसंतीचे बघणे सुरू होते.

वाचनामुळे विविध विषयाचे ज्ञान होते हे जरी बरोबर असले तरी आजची पिढी हेच ज्ञान वर उल्लेख केलेल्या माध्यमाचा उपयोग करुन मिळवतो. ही माहिती तोकडी किंवा सर्वसाधारण स्वरुपाची असते. सविस्तर माहितीसाठी ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो.

समाजाच्या विकासात सर्वात मौल्यवान भाग जर कोणता असेल तर तो ग्रंथाचा पण या गोष्टीचा आपण फायदा करुन घेत नाही. जी ग्रंथ आपली ज्ञान जिज्ञासा पुरी करु शकतात. आपला मनोविकास करतात, आपले व्यक्तिमत्व घडवितात तीच उपकारक ठरतात. कित्येक पुस्तकातुन लेखन आपल्या जीवनातील अनुभवाचे व घेतलेल्या शोधाचे सार देत असतात. त्यात त्यांनी अनेक वर्षात मिळविलेल्या शहाणपणाचा अर्क असतो. या सर्व गोष्टी आपणास पुस्तकाशिवाय इतर ठिकाणी सापडणार नाहीत. याशिवाय आपला व्यवसायात उपयोगी पडतील अशीही पुस्तके लिहली जातात. अशी पुस्तके आपण ग्रंथालय व पुस्तकाची दुकाने इत्यादी ठिकाणाहून मिळविणे आवश्यक असते. ग्रंथाचे महत्त्व सांगताना लोकमान्य टिळक असे म्हणतात. तमी स्वर्गापेक्षा अधिक स्वागत चांगल्या पुस्तकाचे करीन, कारण पुस्तक जेथे असते तेथे स्वर्ग निर्माण होतो.

**वाचनाची सवय :**

जगातील प्रत्येक राष्ट्रात साक्षरता अभियान चालू आहे. प्रत्येक मानवाला अक्षर ओळख व्हावी. ती टिकून रहाण्यासाठी वाचन साहित्य मिळावे आणि ते वाचण्यास मानवास उपयुक्त करावे असे प्रयत्न सर्व पातळ्यावर होत असतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन (UNO) च्या जनरल असेंबलीने इस. १९९० हे वर्ष आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष म्हणून जाहीर केले. कारण प्रत्येक बालकाला लिहणे वाचणे याची आणि प्रौढांना वाचनाची संधी मिळेल याची ग्वाही मिळाणे आवश्यक झाले आहे.

भारताचा पंतप्रधानांनी इस १९९० हे वर्ष साक्षरता वर्ष व त्यानंतरचे दशक हे साक्षरता दशक म्हणून जाहिर केले. आता साक्षरतेसाठी प्रयत्न चालू असतानाच वाचनाची सवय वाढविणे तिचे महत्त्व ठसविणे Inclating यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. हे सर्वमान्य झाले असूनही वाचनासाठी वेळ काढण्याऐवजी फेसबूक, व्हॉट्सॲप, युट्युब व टीव्ही बघणे याकडे युवकांचा कल दिसून येतो.

जगातील उत्तम शिक्षक प्रत्यक्ष समोर नसले तरी ग्रंथ वाचनातून अधिकाधिक शिकता येते, परत परत अनुभवता येते, विकसित संस्कृतीची ही ग्रंथनिर्मिती म्हणजे मानवजातीच्या अमूल्य असा खजिना असतो म्हणून ग्रंथाचे, भविष्यासाठी जतन करावयाचे असते. ते काम ग्रंथालय करतात. ग्रंथातून म्हणजे कागदाच्या माध्यमांतून आतापर्यंत ज्ञानवहन होत आले आहे. चालू काळात प्रकाशित ग्रंथाबरोबर इ-माध्यमांद्वारे विकसित झाली आहेत. कागद माध्यमाबरोबर इ-माध्यमातून संस्कृतीचे जतन व वहन होत आहे.

**वाचन कोणी करावे :**

- विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासाला उपयुक्त अशी ग्रंथ नियतकालिके, संदर्भ ग्रंथ इत्यादी साहित्य वाचावे.
- शिक्षकांनी शिकविण्यासाठी उपयुक्त अशी माहिती साधनांचे वाचन करावे.
- संशोधकांना सतत त्यांच्या संशोधनाला उपयोगी पडेल अशा नव्या व मुलभूत माहितीची गरज असते संशोधक वाचन खालील उद्देशांनी करतात.
- आपल्या आवडीच्या संशोधनाच्या विषयात घडणाऱ्या नव्या घडामोडींची अद्ययावत माहिती घेण्यासाठी

- ➢ आपल्या ज्ञानक्षेत्रातील नव्या संशोधनाची परिपुर्ण माहिती मिळविण्यासाठी
- ➢ संशोधन सुरू असताना निरनिराळ्या टप्प्यांत आवश्यक ती माहिती उपयोगात आणण्यासाठी
- ➢ त्या विषयात ज्ञानाची पातळी कोठवर गाठली गेली आहे ते पाहण्यासाठी
- ➢ त्या विषयाच्या ज्ञानात कोणत्या उणिवा आहे हे जाणून घेण्यासाठी
- ➢ पूर्वी झालेल्या संशोधनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी
- ➢ व्यावसायिकाने वाचन करणे आवश्यक आहे.

➢ वैद्यकीय व कायदेविषयक व्यावसायिकांना आपला व्यवसाय उत्तम रितीने चालविण्यासाठी माहितीची नितांत गरज असते. वैद्यकिय क्षेत्रातील नव्या संशोधनाची माहिती घेतल्याशिवाय डॉक्टरचे काम चालणार नाही. इंजिनियर्स व तंत्रज्ञान्यांना त्यांच्या क्षेत्रातील परिपूर्ण माहिती साधनाचे वाचन करणे जरूरीचे असते.

- ➢ शेतकऱ्यांना नवीन कोणकोणती बियाने, बाजारात आले आहे.
- ➢ गृहिणीला ग्रहसजावट करण्यासाठी
- ➢ महिलांना बालसंगोपन व मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी.

हे जाणून घेण्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे.

**वाचनाची आवश्यकता :**

➢ एखादे पुस्तक एखाद्याच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकत. एक पान एखाद्याचे आयुष्य बदलू शकत आणि एक वाक्य एखाद्याच्या आयुष्याचं ध्येय ठरवू शकत. एवढी ताकद वाचनात आहे. तेव्हा रोज एक तरी पान वाचत जा.

➢ श्रीमंत माणसेच वाचन करतात असे नसुन वाचन करणारेच श्रीमंत होतात जसे शरीरासाठी दिवसातुन दोन वेळा जेवण आवश्यक असते तसे उत्तम मेंदुसाठी दररोज दोन तास वाचन करणे आवश्यक असते. दररोज वाचनामुळे माणूस भानावर येतो.

- ➢ जगाच्या आतापर्यंत जो विकास आला आहे तो वाचनामुळे आणि जगाचा ऱ्हास टी.व्ही. मुळे होत आहे.
- ➢ पुस्तक वाचनारा माणूस कधीही व्यसन करत नाही.
- ➢ वाचनामुळे ज्ञानात भर पडते.
- ➢ वाचन करणारी माणसं मनाने, विचाराने व कृतीनेही श्रीमंत होतात.

➢ वाचन करणारा माणुस शांत असतो त्यामुळे त्याला रक्तदाब वाढणे, हृदय विकाराचा झटका येणे अशा गोष्टी संभवत नाहीत. या उलट जास्त टी.व्ही. मोबाईल वापरणारेच रोगांना बळी पडत असल्याचे समोर येत आहे.

➢ वाचनामुळे माणूस नम्र होतो.

➢ जिथे वाचन होते तेथे विचार होतात आणि जेथे विचाराचे स्वातंत्र्य नाही तेथे गुलामी येते. वाचनामुळे ध्येय ठरविता येतात.

➢ ध्येयाविना जगणे म्हणजे बिगर पत्याचे पत्र पोस्टात टाकणे होय.

**वाचनापासून होणारे फायदे :**

- ➢ वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होतो.
- ➢ वाचनामुळे ज्ञानप्राप्ती होते.
- ➢ वाचनामुळे व्यक्तिचे मनोरंजन होते.

**वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होतो :**

वाचनामुळे बौध्दिक, भावनात्मक विकास तर होतोच परंतु संस्कृती आणि मानवी समाजाचा तो महत्त्वाचा घटक ठरतो. वाचनामुळे राष्ट्रीय अस्मिता जोपासता येणे शक्य होते. वाचन हा सुशिक्षित व सुसंस्कृत समाजातील महत्त्वाचा संस्कार आहे.

दैनंदिन वृत्तपत्र वाचनामुळे माहितीचे चिकित्सक पध्दतीने वर्णन करता येते. निबंधातील विविधता वाढून नवीन सुविचार म्हणी, कल्पनांचा विस्तार होवून कथा, कथन, वाचन, पाठांतर, स्पर्धेसाठी वाचन उपयुक्त ठरते. पत्रलेखन सुधारते. व्यासपीठावरील धीटपणा वाढतो. वाचनामुळे आयुष्यभर शिक्षण घेता येते. चांगला वाचक हा यशस्वी विद्यार्थी होऊ शकतो.

**वाचनामुळे ज्ञानप्राप्ती होते :**

चांगली चांगली पुस्तके व वर्तमानपत्राचे नित्य वाचन केल्याने ज्ञानाची एकसारखी वृध्दी होत असते. व त्याच्या व्यवहारात उपयोग होत असतो. मनुष्याला जीवन जगत असताना, धंदा,व्यवसाय करावयाचा असतो त्याच्याशिवाय इतर गोष्टीचे ज्ञान त्याने संपादिले असता त्याला उपयोगी पडते. न त्याच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींचे ज्ञान संपादन केल्यास फायदाच होतो. माहिती तंत्र ज्ञानाचा युगात जगात दररोज नवनवीन कल्पना, नवीन शोध, नवीन युक्त्या निर्मिल्या जात आहेत. ज्यानी वाचनाची सवय ठेवली त्यांना नवीन ज्ञान निर्मितीचा फायदा धंदा, व्यवसाय करण्यात होतो.

**वाचनामुळे व्यक्तिचे मनोरंजन होते :**

केवळ व्यक्तिच्याच दृष्टीने पाहिले तर व्यवहार आणि राज्यकारण यासंबधाने वाचनापासून जे लाभ होतात. त्याशिवाय आणखी एक महत्त्वाचा लाभ त्याला होतो. चांगले पुस्तके वाचल्याने मनुष्यास समाधान मिळते. विशेषता धार्मिक पुस्तके जगण्यास प्रेरणा देतात.

सुमारे साडेतीनशे वर्षापूर्वी रामदास स्वामीनी आपल्या दासबोध या ग्रंथात प्रसंगी अखंडीत वाचीत जावे असे सांगून एका आदर्श जीवनाची मार्गदर्शिका विषद केली आहे.

पुस्तकांच्या वाचनातून आपण इतिहास, संस्कृती, रुढी, परंपरा व वैज्ञानिक प्रगतीचा मागोवा घेता येतो. वाचन ही ६४ कला पैकी एक कला असल्याचे विष्णूशास्त्री चिपळूणकरानी लिहून ठेवले आहे. ज्ञानवंत व सुसंस्कृत माणूस घडवणं हे शिक्षणाचे ध्येय असतं. अशा शीलवंत व ज्ञानी समाजाची आज जास्त निकड आहे. असे उच्च शिक्षण देण्यात शैक्षणिक संस्थेच्या ग्रंथालयाच्या व्यक्तिविकासाचे साधन म्हणून उपयोग होते.

**वाचन छंदाचे उदाहरणे :**

अमेरिकेची राष्ट्राध्यक्ष आब्राहम लिंकन खूप खडतर परिस्थिती झगडत वर आला. लाकडे फोडता फोडता त्याच्या मनात घोळत ती वाचलेली नि वाचावयाची पुस्तके. अनेकदा दुर्मिळ पुस्तक वाचण्यासाठी उसने आणण्यासाठी वीस वीस मैलांची रपेट त्याला करावी लागे. कधी कधी पुस्तके विकत घेण्यासाठी दुसऱ्याच्या शेतात राबावे लागे. न जाणो ते पुस्तक पुन: कदाचित मिळणार नाही म्हणून पाठ करुन टाकीत. इंग्लडचे पंतप्रधान ग्लॅडस्टन नवदीपाशी ठेपले तरी वाचीत बसे. अमेरिकन साहित्यीक ऑलिव्हर बेंडेल होम्स असाच पिकल पान होऊन पुस्तकाची डोळ्यांशी धरुन वाचायचा. त्यांना एकदा एका मुलाने विचारले आजोबा कशासाठी वाचता आता ? त्यांनी दिलेले उत्तर मज्जेशिर आहे. मनाला वळण लावण्यासाठी To improve my mind. डार्विन तर हातात पुस्तक धरण्याचे कष्ट सोसवेनात म्हणून ग्रंथ फाडून त्याची पाने वाचीत पडे. डॉ. जॉन्सन असाच जबरा वाचक होता. स्वत:च्या कोटास त्यांनी दोन जास्तीची खिसे शिवून घेतले होते. त्या खिशात ग्रंथ ठेवून वेळ मिळाला कि वाचत असत. आपल्याकडे ही न्यायमुर्ती रानडे लोकहितवादी, महात्मा फुले, टिळक, गोखले, चंदावरकर, न.र. फाटक, दुर्गा भागवत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्र. के. आत्रे, पु.ल.देशपांडे, हरिनारायण आपटे हे महाराष्ट्रातील ग्रंथ वेडे माणसे होय.

**महाविद्यालय विद्यार्थ्यांचे वाचन :**

भारतातील महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थी काय वाचतात याचा सर्व्हे, कर्जन कमिशन १८८२, कोलकाता विद्यापीठ कमिशन १९०५, राधाकृष्णन कमिशन १९४८, कोटारी आयोग १९६४-६६, यानी केलेला आहे. वरील कमिशनने आपला अहवालात असे नमुद केले आहे की, महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर शिक्षण घेत असलेले मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी पाठ्यपुस्तके व परीक्षेच्या दृष्टीकोनातून वाचत आहेत. तसेच ग्रंथालयासाठी ६.५% पर्यंत आर्थिक साधने उपलब्ध करुन द्यावेत असेही निर्देशित करण्यात आले.

आजचा सायबर कॅफेला भेट देणारा विद्यार्थी महाविद्यालयच्या ग्रंथालयात मात्र केवळ अभ्यासाविषयांची पुस्तके घेण्या पुरता जाताना दिसतो. पुस्तके आणि विद्यार्थी हा संबंध केवळ परीक्षापुरताच दिसून येतो. पण विद्यार्थ्यांने ग्रंथालयात कशासाठी जायचे हे समजून घेणे आवश्यक. तुम्हाला स्पर्धा परीक्षा, मुलाखतीला सामोरे जायचे आहे. आपण जसे डॉक्टर व वकील यांची मदत घेतो तशीच ग्रंथपालाकडून माहितीविषयक मदत घेणे स्वाभाविक समजावे.

**ग्रंथालयात काय वाचावे :**

१. रोजचे वर्तमानपत्र वाचणे, मातृभाषेतील आणि काळाची गरज ओळखून किमान एक इंग्रजी वृत्तपत्र वाचावे.
२. एखादे नियतकालिक वाचावे, त्यातील लेख, एखादे सदर मनोरंजक माहिती वाचावे.
३. एखादा कथासंग्रह, कादंबरी, नाटक इ. वाचून पहा.
४. संदर्भ ग्रंथात डोकावणे, शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, वार्षिके इ.
५. चरित्रग्रंथ वाचणे हे वाचकांची अभिरुची दर्शविते.
६. चांगले वाचक चरित्रग्रंथाकडे वळतात, असे दिसतात.

याशिवाय, काही वेळा निबंध, वकृत्व नाट्यस्पर्धा इ. साठी संदर्भ मिळविणे अतिशय गरजेचे असते. अशा वेळी महाविद्यालय ग्रंथालयातून ग्रंथपालाशी मदत घेता येते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ग्रंथालयाचा जरुर वापर करा. आपली माहिती मिळविण्याची भूक भागवा व जीवन सफल करा.

विद्यार्थ्यांच्या थोडे वाचनासंबधी या लेखात के.जे. पुरोहित यांनी अतिशय मज्जेशिर गोष्ट विदर्भ महाविद्यालय अमरावतीच्या एम.ए. च्या विद्यार्थ्याची मौखिक परीक्षेमधील घटना आहे. परीक्षकाने विद्यार्थ्यांनी वाचलेले समजले का हे जाणून घ्यायचे असते. एक ३५ वर्ष वयाचा विद्यार्थी अधिकारी पदावरील नोकरी संभाळून परीक्षा देत होता. विद्यार्थ्याला परीक्षकाने विचारले, एकुण आपण दिलेल्या आठ पेपरपैकी सगळ्यात चांगला पेपर संबधी तुम्हाला माहिती विचारणार आहोत. कोणता पेपर चांगला गेला. विद्यार्थ्याने शेक्सपियरचा पेपर उत्तर दिले. व या पेपरमध्ये चांगले गुण पडतील. परीक्षकाने विचारले शेक्सपियरच्या एकुण ३६ नाटकापैकी किती नाटके वाचली आहेत. एकही नाही असे एम.ए. च्या विद्यार्थ्याने उत्तर दिले. एकही पुस्तक न वाचता समाधान कारक उत्तरे लिहण्याची

देण्याची सोय परीक्षा पध्दतीत आहे. तिचा फायदा मी घेतला. त्यामुळे यावरुन वाचना बाबत प्रश्न चिन्ह उभे रहाते.

माझ्या महाविद्यालयातील एक विद्यार्थिनी एक दिवस ग्रंथ परत करण्यास उशिर झाल्यामुळे मला भेटण्यास आली. विद्यार्थिनीने ग्रंथालयातील ग्रंथ पाहून एवढे ग्रंथ ग्रंथालयात आहेत तर त्याच्या उपयोग कोण करतो अशी विचारणा केली. मी विद्यार्थी व प्राध्यापक हे वाचतात असे सांगितले व काही ग्रंथ घेऊन जाण्यास सांगितले. विद्यार्थिनीने दिलेले उत्तर फार मजेशिर आहे, ती म्हणाली कशाला सर, अभ्यासाचे ग्रंथ वाचण्यास वेळ मिळत नाही तर बाकीचे केव्हा वाचावेत.त

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे इ.स. १९८५ पासून इ. बुकचे प्रकाशनास आरंभ झालेचे दिसून येते. २१ व्या शतकाच्या दोन दशक पुर्ण होत असताना जगभरात २५% ई-ग्रंथ प्रकाशित होत असल्याचे दिसून येत आहे. यापूढील प्रगत प्रकाशनाची अवस्था म्हणजे ऑडिओ ग्रंथ प्रकाशित होत आहे. मोफत ऑडिओ बुक २४,००० ग्रंथाचा संग्रह लिब्रीहोक्स या ॲपमध्ये आहे. या संग्रहामध्ये दुर्मिळ व छपाई बंद झालेले काही प्रसिध्द जुन्या पुस्तकांचाही संग्रह या ॲपवर ऐकायला मिळतो. या शिवाय गुगल पले बुक्स, स्टोरीटोल व ऑडीबल हे ऑडीओ बुकचे ॲप सशुल्क स्वरुपात उपलब्ध आहेत. वाचकांनी याचा लाभ घेणे गरजेचे आहे.

**सारांश :**

ग्रंथालयात यावे, अभ्यासिकेत विचार स्विकारावेत, मनन, पठन, चिंतनाद्वारे कृतीत उतरवावे. चरित्रामधून परिवर्तनासाठी काही वेचावे, आकार, उंची, मनाची प्रगल्भता स्थिर करण्यासाठी वाचनाला स्विकारावे, विचारांची मदत घ्यावी स्पर्धेत टिकता यावे. अज्ञान गळती प्रमाणे कमी व्हावे. उच्च शिक्षणांत मदत होईल हे सर्व वाचनांमुळे शक्य आहे.

मोबाईल संस्कृतीमुळे मुलांची वाचनाची आवड कमी झाली आहे; पण मुलांनी मोबाईलबरोबरच वृत्तपत्रे, मासिके, बोधकथेची पुस्तके वाचनाची गोडी लावून घेतली पाहिजे. आपल्याला ज्ञानाचा साठा करायचा असेल तर ग्रंथांसारखे गुरू नाहीत. ते वाचकाला अमर्यादित असे ज्ञान प्रदान करतात. मुद्रणकलेने वाचनसंस्कृतीत प्रचंड क्रांती केली आहे. ग्रंथांच्या वाचनाने अनेकांचे भविष्य उज्ज्वल झाले. वाचनाच्या सवयीने आपले लिखाण व ज्ञानसाठा वाढत जातो. त्यामुळे मुलांनी मोबाईलचा वापर थोडा कमी करुन ग्रंथांशी मैत्री वाढविली पाहिजे. या ग्रंथानाच आपले गुरू केले पाहिजे. कारण हे ग्रंथरूपी गुरूच आपले खरे गुरू आहेत. वाचनाला सुरूवात करून ज्ञान समृध्द करा, मन व मेंदूला सशक्त बनवा. अलीकडच्या काळात वाचनसंस्कृतीविषयी वारंवार चर्चा होताना दिसते. जुनी पिढी नव्या पिढीला दोष देते. मात्र, उपाययोजना सुचवीत नाहीत. काळाच्या प्रवाहाप्रमाणे बदल होत जातात. नवनवीन माध्यमे तरुणाईला भुरळ घालतात. अगदी बालसुलभ वयापासुनच त्याचे आकर्षण वाढत जाते. याबाबत त्यांना विश्वासात घेऊन संवादी बनवून वाचनसंस्कृती वाढवायला हवी.

**संदर्भसूची :**

१. काळसेकर सतीश (२०१४), वाचणा-याची रोजनिशी, मुंबई, लोकवाङमय गृह
२. कोराले आशा जगन्नाथ (ऑक्टो. २०१०) पुस्तक वाचून काय मिळते, ग्रंथ परिवार.
३. ठाले पाटील कौतिकराव (२००८) वाचनवेध औरंगाबाद, मराठवाडा साहित्य परिषद
४. राजगुरू मेघमाला (१९९५) वाचन कौशल्य : कृती, गती आणि प्रगती, पुणे, उन्मेष प्रकाशन.
५. वैद्य विलास (मार्च-एप्रिल २००७) लमुल्य शिक्षणाचा पाया वाचन संस्कृतीी, ग्रंथपरिवार.
६. हिंगवे कृ.श. (मार्च १९८५), ग्रंथालये आणि आपला समाज, मैत्रिच्या पलीकडे.

❑❑❑